जिल्हा व सत्र न्यायालय, नंदूरबार यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक : अस्थायी ०११८/१०५९/प्र.क्र.६/कार्यासन ११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०१८

पहा : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१,वित्तीय सुधारणा,दि.१०/९/२००१.
२.शासन निर्णय क्र.अस्थायी ०९१७/३२१/प्र.क्र.२०७/कार्यासन ११,दि.९/११/२०१७.
३. शासन निर्णय वित्त विभाग क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क्र., दि.८/१/२०१८
४.उच्च न्यायालय,मुंबई यांचे पत्र क्र.B(Gen)-१००१/२०१७/१५४३,दि.१६/१२/२०१७.
५.जिल्हा न्यायालय, नंदूरबार यांचे पत्र /क्र.Estt/१९५९/२०१७, दि.१६/११/२०१७

प्रस्तावना:

जिल्हा न्यायालय, नंदूरबार यांच्या आस्थापनेवरील ५१ अस्थायी पदांना संदर्भांकित क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि.१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

शासन निर्णय :

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदूरबार यांनी दि.१६/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार त्यांच्या आस्थापनेवरील पुढील तक्यात नमूद ५१ अस्थायी पदांना य शासन निर्णयान्वये त्यापुढील म्हणजेच दि. १/१/२०१८ ते दि. २८/२/२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदांची संख्या
१	प्रबंधक	१
२	अधिक्षक	२
३	सहाय्यक अधिक्षक	६
४	लघुलेखक (उ.श्रे.)	२
५	लघुलेखक (नि.श्रे.)	३
६	वरिष्ठ लिपिक	७
७	कनिष्ठ लिपिक	१७
८	मुख्य बेलिफ	१
९	बेलिफ	४
१०	पुस्तक बांधणीकार	१
११	शिपाई	५
१२	पहारेकरी	२
एकूण		**५१**

यासाठी होणारा खर्च जिल्हा न्यायालय, नंदूरबार या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान दत्तमत, दिवाणी व सत्र न्यायालये (००)(०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश (२०१४ ०१७२) ०१, वेतन या लेखाशीर्षाखालील सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.८/१/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०११९१५५१५९९६१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2018.01.19 15:57:46 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जिल्हा न्यायालय, नंदूरबार.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, नंदूरबार.
६) वित्त विभाग, आ.पु.क.कक्ष, मंत्रालय, मुंबई.
७) विधी व न्याय विभाग, कार्या- २०/२३ मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (कार्यासन ११).